**ठळक बातम्या**

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१७ मधल्या ओबीसी आरक्षणानुसार घेण्यात येणार असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक मुंबईत सुरू

- माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं निधन

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन- तेंडुलकर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारताचा रोमहर्षक विजय, मालिका बरोबरीत सुटली

**<><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१७मधल्या स्थितीनुसार ओबीसी आरक्षणानुसार घेण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२२ च्या प्रभाग रचनेनुसार घ्याव्या अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली असल्याने २०१७ मधल्या ओबीसी आरक्षणानुसार सर्व जिल्ह्यांमधे निवडणुका होतील, असं ते म्हणाले......

**होल्ड –बाईट- मुख्यमंत्री (३५ सेकंद)**

मुंबई महानगर क्षेत्रातल्या आणि इतर अशा ३३ पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांचा आढावा आजच्या वॉररूम बैठकीत घेण्यात आला. मुंबईतली वाहतुकीची समस्या सोडवण्याच्या दृष्टीनं विविध उपाययोजना शासन करत आहे असं त्यांनी सांगितलं. त्यात मल्टीमोडल कॉरिडॉर, मेट्रो प्रकल्प नवीन रस्त्यांवरचे बोगदे अशा

कामांचा समावेश होता. वर्धा-गडचिरोली आणि वर्धा - नांदेड रेल्वे प्रकल्पांना गती देण्याबाबत तसंच  पुणे रिंगरोड, आणि मेट्रो प्रकल्प पुढे नेण्याबाबत, त्याचप्रमाणे बीडीडी चाळी, तसंच धारावी पुनर्विकास या प्रकल्पातल्या अडचणींविषयी बैठकीत चर्चा झाली. विकास प्रकल्प वेगाने राबवण्याचे निर्देश बैठकीत दिले असं फडणवीस म्हणाले. या प्रकल्पांशी संबंधित केंद्र आणि राज्यसरकारचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

मुंबईतले कबुतरखाने तसंच नांदणीतल्या हत्तिणीचं पुनर्वसन या संदर्भात न्यायालयाचे आदेश असले तरी जनभावना लक्षात घेऊन काही उपाय करता येईल का याविषयी चर्चा करण्यासाठी उद्या बैठक बोलावली असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून सुरू झाली. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती येत्या बुधवारी पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करेल. आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पत पुरवठ्याला चालना देण्यासाठी रेपो दरात पाव टक्के कपात होण्याची शक्यता भारतीय स्टेट बँकेनं वर्तवली आहे. मात्र सलग तीन वेळा व्याज दर कमी केल्यामुळे आता रिझर्व्ह बँक व्याज दरात बदल करणार नाही, असं मत काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

पुण्यात १ ऑगस्ट रोजी ३ तरुणींना चौकशीसाठी बेकायदेशीररीत्या ताब्यात घेणाऱ्या पोलिसांच्या विरोधात तत्काळ गुन्हे दाखल करून त्यांना अटक करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी आणि पुण्याच्या पालकमंत्र्यांनी जातीनं लक्ष घालावं, अशी मागणीही त्यांनी केली. पोलिसांनी सर्वसामान्य जनतेला कायद्याचा धाक दाखवण्यापेक्षा

शहरातले अवैध धंदे आणि गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी काम करणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरीजवळ हातखंबा गावात आज सकाळी एलपीजी वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात झाला. चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे रस्त्यावरून खाली येऊन हा टँकर शाळेजवळच्या एका टपरीत घुसला आणि त्याने दोन-तीन दुचाकींना धडक दिली. टँकरचा चालक जखमी झाला आहे. अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी काही काळ मुंबई-गोवा महामार्गावरची वाहतूक रोखून धरली होती. महामार्ग चौपदरीकरणाचं काम सुरू असून, त्या संदर्भातलं नियोजन चुकल्यामुळे अपघात होत असल्याचं, तसंच ज्वलनशील पदार्थांची वाहतूक करणाऱ्या टँकरचे या भागात वारंवार अपघात होत असल्यामुळे परिसरातल्या नागरिकांच्या जीविताला धोका असल्याचं ग्रामस्थांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत व्याजदर कपातीचं सावट कायम असूनही आज देशातल्या शेअर बाजारात तेजी कायम राहिली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ४१९ अंकांनी वधारून ८१ हजार १९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही १५७ अंकांची वाढ झाली आणि तो २४ हजार ७२३ अंकांवर बंद झाला. धातू, वाहन, माध्यम, माहिती तंत्रज्ञान आणि बांधकाम क्षेत्रातल्या समभागांची मोठ्या प्रमाणावर खरेदी झाल्यामुळे शेअर बाजारात उत्साहाचं वातावरण होतं. ग्राहकोपयोगी वस्तू, ऊर्जा आणि आर्थिक सेवा क्षेत्रावर मात्र विक्रीचा काहीसा दबाव राहिल्याचं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं आज नवी दिल्लीतल्या सर गंगाराम रुग्णालयात निधन झालं, ते ८१ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंडविकारावर उपचार घेत होते.

शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य होते. दुमका मतदारसंघातून ते तीन वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. तर दोन वेळा राज्यसभेचे सदस्य होते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात ते कोळसा मंत्री होते. संथाल जमातीतले सोरेन यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी दीर्घ लढा दिला होता. झारखंडचं मुख्यमंत्रीपद त्यांनी तीन वेळा भूषवलं.झारखंडचे विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होते. शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल झारखंडमधे तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाला असून झारखंड विधानसभेचं अधिवेशन अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं आहे. त्यांचं पार्थिव आज रांचीला नेण्यात येणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांनी सर गंगाराम रुग्णालयात जाऊन शिबू सोरेन यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं, तसंच हेमंत सोरेन यांचं सांत्वन केलं.

**<><><><><>**

राज्यसभेचं कामकाज आज सकाळी सुरु झाल्यावर शिबू सोरेन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली, आणि त्यानंतर सदनाचं कामकाज उद्या सकाळपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेतही शिबू सोरेन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन- तेंडुलकर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेतला अखेरचा आणि पाचवा सामना आज भारतानं सहा धावांनी जिंकला. विजयासाठी ३७४ धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या इंग्लंडचा दुसरा

डाव ३६७ धावात आटोपला. ५ गडी बाद करणारा मोहम्मद सिराज हा भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला. तोच सामनावीर ठरला. या विजयामुळे ही मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. लंडनच्या ओव्हल मैदानावर आज पाचव्या दिवशीचा खेळ सुरू झाला तेव्हा ६ बाद ३४७ या कालच्या धावसंख्येवरून इंग्लंडनं खेळायला सुरूवात केली. त्यांना विजयासाठी अवघ्या ३५ धावा हव्या होत्या. हे आव्हान ते सहजपणे पेलतील असं वाटत असतानाच पुढच्या सात धावांत त्यांचे तीन गडी तंबूत परतले आणि सामना रंगतदार अवस्थेत पोचला. त्यानंतर विजयासाठी अवघ्या २० धावा हव्या होत्या आणि त्यांचा एक गडी बाकी होता. सिराजनं टाकलेल्या सुरेख बॉलवर गस अटकिनसन बाद झाला आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब झालं.

**<><><><><>**

मोबाइलद्वारे फसवणुकीच्या अनेक घटना सध्या घडत आहेत. अशा घटना घडू नयेत म्हणून जनजागृती करणाऱ्या 'सायबर संस्कार' नावाच्या कार्यक्रमाचं आयोजन रत्नागिरीत नगरपालिकेच्या सहकार्यानं केलं होतं. त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड कोनकर व्हीसी (४९ सेकंद)**

**<><><><><>**

राज्यात गेल्या २४ तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या २४ तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. राज्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, वर्तवण्यात आली आहे.

**//<><><><><>//**